९|५

महाराष्ट्र शासन

अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्
दुरध्वनी क्रमांक- ०२४२६-२४३२१५
इ-मेल- dracdmpkv2013@rediffmail.com

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

कार्यालय- उपकुलसचिव (विद्या)

पत्ता-
मध्यवर्ती परीसर, प्रशासकीय इमारत,
मफुकृवि, राहुरी. जि. अहमदनगर
पिन- ४१३७२२

## जाहीर निवेदन
## पदवीप्रदान समारंभ

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी चा ३५वा पदवीप्रदान समारंभ दि. २८.१०.२०२१ रोजी संपन्न होणार आहे. ज्या पदवीधारक स्नातकांनी दिनांक ३०.०६.२०२० व दिनांक ३०.०६.२०२१ पर्यंत पदवी व दि.३१.१२.२०१९ व दिनांक ३१.१२.२०२० पर्यंत पदव्युत्तर पदवी / आचार्य परीक्षा उत्तीर्ण असलेले गुणपत्रक प्राप्त केले आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासंबंधीचा विहीत अर्ज तसेच विहीत शुल्क ऑनलाईन/ ऑफलाईन पद्धतीने भरुन आपापल्या महाविद्यालयाकडून पदवी प्रमाणपत्रे घेऊन जावेत.

कोविड १९ चा प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन प्रदवीप्रदान समारंभासाठी विद्यार्थ्यांना व्यक्तीशः उपस्थित राहता येणार नाही.

**विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी संबंधीत महाविद्यालयाकडे विहित नमुन्यातील अर्ज करावा.** अर्जा सोबत गुणपत्रक (Transcript) ची साक्षांकीत प्रत तसेच 'नियंत्रक, मफुकृवि, राहुरी' यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मफुकृवि येथील खाते क्रमांक ३९३१९१३४८५५ आय एफ एस सी क्रमांक **SBIN0003239** मध्ये ऑनलाईन / ऑफलाईन पद्धतीने भरणा केलेल्या रकमेची स्वसाक्षांकीत पावती (ऑनलाईन भरणा केल्यास Successful Transaction /Transaction Number/UTR number च्या स्क्रीन शॉटची प्रिंट आणि ऑफलाईन भरणा केल्यास बँकेच्या Deposit Slip ची प्रत) अर्जासोबत जोडावी.

१. महाविद्यालयात व्यक्तीशः उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र घेणा-या विद्यार्थ्यांसाठी (In person) : रुपये ८००/-

२. महाविद्यालयाकडून पोष्टाने पदवी प्रमाणपत्र मागविणा-या विद्यार्थ्यांसाठी (In absentia) : रुपये १०००/-

या संबंधीचे छापील अर्ज महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय व संलग्न महाविद्यालयात कार्यालयीन वेळेत विनामुल्य उपलब्ध होऊ शकतील. तसेच विद्यापीठाच्या www.mpkv.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

जा.क्र. विद्या-१०/३५वा पप्रस/२०२८/२०२१
दिनांक- ०७/१०/२०२१

(प्रमोद लहाळे)
कुलसचिव

D:\Convocation 35\06. Notification of 35rd covocation.docx